2019-20

ISSN : 2456-9658

Bi-Annual refereed Journal

# Global Researcher View

## An International Peer Reviewed Journal of Social Sciences and Humanities

RNI No. RAJBIL/2016/71973

Special Issue : 02 October 2019

## महात्मा गांधी : विचार, तत्त्वज्ञान आणि प्रेरणा

Editor
Chandra Shekhar Kachhawa

globalreasearcherview2015@gmail.com

Scanned with OKEN Scanner

ISSN : 2456-9658


| | | | |
|---|---|---|---|
| 24 | महात्मा गांधी यांची ग्रामस्वराज्य संकल्पना | प्रा.डॉ. गोराळे एस.आर., प्रा.पोटभरे एस.डी. | 72 |
| 25 | म. गांधी यांची ग्राम 'स्वराज्य संकल्पना' काळाची गरज | डॉ. गजानन रा. मुधोळकर | 75 |
| 26 | महात्मा गांधीजींची ग्रामस्वराज्याची संकल्पना : एक समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा.डॉ. मुंडे रामकिशन हरिदास | 78 |
| 27 | महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार - एक दृष्टिकोन | सौ. पाऊलबुद्धे अनुराधा रामभाऊ, प्रा.डॉ. अशोक कारंडे | 81 |
| 28 | महात्मा गांधी प्रणित ग्रामीण विकास | प्रा. संध्या पेंडकर देशपांडे | 84 |
| 29 | महात्मा गांधींच्या स्वप्नातील भारत | प्रा.पोपळघट आर.एस. | 88 |
| 30 | ग्रामस्वराज्याविषयी महात्मा गांधीजींचे तत्त्वज्ञान व कार्य | प्रा.ईश्वर ल. राठोड | 91 |
| 31 | महात्मा गांधीजी एक असामान्य व्यक्तिमत्त्व | श्री. राऊत रामेश्वर बाबासाहेब | 95 |
| 32 | महात्मा गांधी आणि महिला सक्षमीकरण | प्रा.साळुंके इंदू चंद्रकांत | 97 |
| 33 | पर्यावरण संरक्षणासाठी गांधी विचार काळाची गरज : एक चिंतन | प्रा.डॉ. संजय सांभाळकर | 100 |
| 34 | महात्मा गांधीजींचे ग्रामोद्योगा संबंधी विचार एक अभ्यास | प्रा.सोनवणे गिताबाई शिवराम | 102 |
| 35 | महात्मा गांधीजींचे धार्मिक एकतेचे सैद्धांतिक विचार आणि आजचे धर्माचे राजकारण | प्रा.सौ. सुपेकर वैशाली प्रशांत | 105 |
| 36 | महात्मा गांधी आणि ग्रामीण विकास : एक दृष्टिक्षेप | डॉ. उमाकांत सुभाष गायकवाड | 108 |
| 37 | महात्मा गांधी यांची ग्रामस्वराज्याची संकल्पना | प्रा.डॉ. वैशाली शेषराव पेरके | 111 |
| 38 | महात्मा गांधीचे 'अभंग विचार' | प्रा. प्रकाश रेशमाजी वाणी | 114 |
| 39 | मोहन ते महात्मा : व्यक्तिमत्त्व विकास व चारित्र्य निर्मिती | धामनगावंकर शारदा किशन | 116 |
| 40 | महात्मा गांधी यांचे स्त्रीयाविषयी विचार | प्रा. अनिल जाधव | 119 |
| 41 | महात्मा गांधीजी यांच्या विचारांची प्रासंगिकता | प्रा.श्री. विनोद बैरागी | 121 |
| 42 | 'चले जाव' आंदोलनातील म. गांधीजींची भूमिका आणि वास्तव | कु. संचिता चंद्रकांत मोढवे | 123 |
| 43 | कौशल्य विकासाचे जनक : महात्मा गांधी | प्रा.सचिन चंद्रशेखर कंदले | 125 |
| 44 | महात्मा गांधी - व्यक्ति आणिचरित्र निर्माणातील अग्रणी | प्रा. दीपक अंबादास देशमुख | 128 |
| 45 | भारताच्या सर्वसाधारण भाषांवर महात्मा गांधी यांचा दृष्टिक्षेप | डॉ. सुर्यवंशी रामहरी मधुकर | 131 |




Scanned with OKEN Scanner

GLOBAL RESEARCHER VIEW
An International Peer Reviewed Journal of Social Sciences and Humanities

ISSN : 2456-9658

# महात्मा गांधीजींचे धार्मिक एकतेचे सैध्दांतिक विचार आणि आजचे धर्माचे राजकारण

प्रा. सौ. सुपेकर वैशाली प्रशांत

• सहाय्यक प्राध्यापक, अण्णासाहेब आवटे कॉलेज, मंचर

**प्रस्तावना :**

धर्म, प्रदेश, भाषा, आर्थिक स्थिती या सर्व घटकांच्या संमिश्र प्रभावातून व्यक्तींच्या वर्तन क्रिया व कृती घडत असतात आणि हेच समाजजीवनाचे वास्तव आहे. व्यक्तींच्या सामाजिक जीवनाची रूपरेषा निश्चित करण्यामध्ये या सर्व घटकांचा थोड्याफार फरकाने प्रभाव असतो. जेव्हा या घटकांना प्रमाणापेक्षा जास्त महत्त्व प्राप्त होते, तेव्हा देशासमोर अनेक अशी आव्हाने निर्माण होतात जसे की, आपल्या देशात धर्मावर आधारित राजकारण सतत होत असते. अशी फार कमी माणसे असतात की जी धर्माची विश्लेषणात्मक चिकित्सा करून धर्माचा खरा अर्थ शोधण्याचा प्रयत्न करतात, त्यामध्ये महात्मा गांधीजींचा उल्लेख करावा लागेल. प्रस्तुत संशोधन लेखामध्ये गांधीजींच्या धार्मिक विचारांचा अभ्यास करून विद्यमान परिस्थितीमध्ये या विचारांची प्रासंगिकता अभ्यासण्याचा प्रयत्न केला आहे.

भारतीयांचा ओढा, धर्म आणि अध्यात्माकडे जास्त असलेला दिसून येतो. भारतीयांसाठी धर्म ही आचारसंहिता आहे. जी त्यांचे जीवन व्यवहार व कार्य निर्धारित करते. धर्म हा जीवनमार्ग असतो. व्यक्तिगत आणि सामाजिक अशा दोन्ही पातळ्यांवर धर्माची ही भूमिका येथे सर्वमान्य होती. धर्माचा भारतीय मनावर एवढा प्रचंड पगडा होता की, राज्यसंस्थेची कल्पनाच ते कधी करू शकत नव्हते. मुस्लीमांचे आक्रमण झाल्यानंतर भारतातील मुसलमान सत्तेच्या व राजकीय चिंतनाची सुरुवात झाली. इस्लामी सत्तेची प्रतिष्ठापना ही या राजकीय चिंतनातील महत्त्वाची घटना होती. समाजात वर्णव्यवस्था व जातिभेद दृढ झाले होते. हजारो जाती-उपजाती निर्माण होवून त्यांच्या रोटी-बेटी-स्पर्श व्यवहारांचे कडक निर्बंध समाजात मान्य होते. १८५७ मध्ये ब्रिटिश भारतात लढाई जिंकली आणि हळूहळू अनेक प्रांतांवर आपली सत्ता स्थापन केली. या सत्तेमुळे एक पाश्चात्य समान नागरिकत्व, मानव समानता, पाश्चात्य मूल्यांची चिकित्सा या संकल्पना येथे रुजल्या. पारंपरिक अनिष्ठ रुढी, चालिरिती नष्ट केल्या पाहिजेत अशा जाणिवेतून सामाजिक सुधारणा आणि धर्म विचारांची चिकित्सा नवशिक्षित तरुणांनी सुरु केली. यामध्ये गांधीजींचे विचार सर्वांपेक्षा वेगळे होते.

परंपरा व आधुनिकता यांचा व्यवस्थित मेळ गांधीजींनी घातला ते कोणत्याही एका परंपरेचे विचारवंत नाहीत. अहिंसा, सत्य, असंग्रह, ब्रम्हचर्य ही प्राचीन भारतीय विचार परंपरेतील तत्त्वे त्यांनी स्वीकारलेली. असली तरीही त्यापैकी प्रत्येकाला त्यांनी नवा कालसापेक्ष अर्थ दिला. १९ व्या शतकाच्या अखेरीस सामाजिक सुधारणांपेक्षा राजकीय स्वातंत्र्याचे ध्येय अधिक मानले गेले. हिंदुत्वावर आधारित राष्ट्रभावनेची उभारणी करणे, धर्मनिरपेक्षतेला विरोध करणे, हिंदू धर्मग्रंथांनी जी समाजव्यवस्था सांगितली. तिचे समर्थन करणे या विचारांचे समर्थन होत गेले. महात्मा गांधीजींनी मात्र धर्मनिरपेक्षतेची संकल्पना मांडुन सर्व धर्मांप्रति त्यांच्यातील समान नैतिकतेच्या अनुषंगाने सर्वधर्मसमभाव संकल्पना मांडली.

भारतात गांधींनी गोखल्यांना आपले गुरु मानले. गोखलेंनी गांधींना भारतभर फिरण्याचा सल्ला दिला. राजकारण हे अध्यात्मिक पातळीवर गेले पाहिजे, असे गोखल्यांचे मत होते. गांधींनी सुध्दा राजकारणाला नैतिक पाया असला पाहिजे, या मताचा पुरस्कार केला. गांधजींनी दक्षिण आफ्रिकेत असताना ख्रिस्ती, इस्लाम अशा धर्मांचा खोलवर अभ्यास केला. गांधीजी सत्याग्रहाला एक धार्मिक भक्ती म्हणतात. सत्याग्रहासाठी त्याना सर्वांचा सहभाग आवश्यक वाटतो यासाठीते धर्मनिरपेक्षता व सर्वधर्मसमभावाचा अवलंब करतात. त्यांनी आपल्या विचारप्रणालीत धर्माला प्राधान्य दिलेले असलेतरी ज्या राष्ट्रसभेचे नेतृत्व करीत होते तिची उद्दिष्टे, संघटना, कार्यपध्दती, अधिकृत निवेदन व ठराव या सर्व बाबतीत धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वाचा पुरस्कार करीत होते. त्यांच्या मते भारतासारख्या देशामध्ये नागरिकांच्या जीवनाला व्यापून शिल्लक राहणारी गोष्ट म्हणजे एकमेव धर्म ही होय.

GLOBAL RESEARCHER VIEW ISSN : 2456-9658
An International Peer Reviewed Journal of Social Sciences and Humanities

विकसनशील देशांमध्ये धर्मामुळे मनुष्याचे विचार त्याची वागणूक, त्याचे इतरांशी असलेले संबंध या सर्व गोष्टी प्रभावित होत असतात. एवढेच नव्हे तर धर्माचा परिणाम मनुष्याच्या आकांक्षांवर, तो खर्च करीत असलेल्या बाबींवर आणि उत्पन्नवाढीच्या प्रेरणेवरही होत असतो. समाजसुधारणेचे प्रयत्न करणाऱ्यांना धार्मिक स्वातंत्र्याच्या नावाखाली धर्माचे राजकारण खेळण्यात प्रवीण असलेली मंडळी नेहमी विरोध करीत असतात. अनिष्ट प्रथांना आळा घालण्यासाठी जेव्हा कायदे केले जातात, तेव्हा त्या धर्मातील बहुसंख्य माणसे धार्मिक भावना दुखावल्याची आरोळी ठोकतात. तिहेरी तलाक विधेयक प्रकरणी या गोष्टींचा अनुभव आलेला आहे.

भारताने धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वाचा पुरस्कार केलेला आहे. परंतु भारतीय समाज अजूनही धर्मनिरपेक्ष झालेला नाही. धर्मांच्या नावावर विविध संघटना निर्माण होत असतात. राजकीय पक्ष या संघटनांचा वापर करुन घेतात. कित्येकदा राजकीय लाभांच्या प्राप्तीसाठी धार्मिक संप्रदायवादाला प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे प्रोत्साहीत केले जाते. धर्मांधर्मांमध्ये तिरस्कार निर्माण करुन व्यक्तीच्या धर्माचा वापर राजकीय भांडवल निर्मितीला करतात. गांधीजीचा धर्म हा यापेक्षा वेगळा आहे. त्यांनी सत्य-अहिंसा यावर आधारलेला धर्म स्वीकारला. त्यांच्या विचार आणि कार्यांचे मूल्य धार्मिक, अधिष्ठान होते म्हणून त्यांच्या तत्त्वज्ञानाला धार्मिक तत्त्वज्ञान संबोधले जाते. त्यांनी जवळजवळ सर्वच धर्मांच्या प्रमुख धर्मग्रंथांचा अभ्यास केला होता. भगवद्गीता आणि उपनिषदांचा त्यांच्यावर विशेष प्रभाव होता. त्यामुळेच त्यांच्या तत्त्वज्ञानाला नव वेदांत तत्त्वज्ञान म्हटले जाते. या तत्त्वज्ञानाला त्यांनी व्यावहारिक स्वरुप देण्याचा प्रयत्न केला. गांधीजींना माणसा माणसामधील नैतिकता अपेक्षित होती. सामाजिक नियंत्रण हे धर्मांचे मुख्य कार्य असते. संघर्ष टाळण्याच्या उद्देशाने काही बंधने, नियंत्रणे धर्मांकडून घातली जातात. त्यांची वैश्विक धर्मावर श्रद्धा होती. त्यांनी आपल्या धर्माला विज्ञानाशी संबंधित बनविले कारण विज्ञान हे रूढी, अंधविश्वास, प्रथा, परंपरांच्या विरोधी आहे. धार्मिक क्षेत्रात पारंपरिक कर्मकांडानुसार वागण्यापेक्षा सत्य आणि बुद्धिवाद यांना अधिक महत्त्वाचे मानणे हे त्यांचे मुलभूत योगदान आहे.

एका धर्मातल्या लोकांवर हल्ले करणे, एकमेकांची प्रार्थनास्थळे उद्ध्वस्त करणे या सर्व गोष्टी अमानवीय आहेत, असे ते मानतात.

**निष्कर्ष :**

भारतात राजकीय स्वार्थ साधण्यासाठी देव आणि धर्माचा आधार घेण्याची कारस्थाने सतत होताना दिसतात. छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेला अफजलखानाचा वध या ऐतिहासिक घटनेवरून साडेतीनशे वर्षानंतर सुध्दा धर्मांचे राजकारण करून अफजलखानाच्या वधाच्या चित्रावरून ते वापरण्यास बंदी घातली जाते. एवढेच नव्हे तर संसदेच्या सभागृहात सभापतींचे स्वागतकरताना जय श्रीराम, सतश्री अकाल, अशा घोषणा दिल्या जातात. धर्मविषयक संकुचित विचार सोडून देणे अत्यंत आवश्यक आहे. जागतिकीकरणामुळे निर्माण झालेला साम्राज्यवाद आणि धर्मांध हिंसक शक्ती हे दोन प्रमुख अडथळे आहेत. जगभर या दोन गोष्टींनी हैदोस घातलेला आहे. दहशतवाद, धार्मिक असहिष्णूता ही मुख्य आव्हाने निर्माण झालेली आहेत. नव्वदच्या दशकाच्या सुरूवातीला मंदिर वही बनाएंगे, या घोषणेने एक उन्मादी वातावरण निर्माण झाले होते. त्यानंतर धार्मिक दंगली आणि मार्चमध्ये मुंबईमध्ये झालेले साखळी बॉम्बस्फोट या घटनांनी संपूर्ण देशभर अशांतता, धार्मिक संघर्ष निर्माण झाला होता. धर्मांच्या आधारावर राजकारण केले जात असल्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेला फार मोठा धोका निर्माण होतो. या सर्व धार्मिक प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर गांधीजींच्या धार्मिक विचारांची प्रासंगिकता लक्षात घेणे आवश्यक वाटते. त्यांनी धर्माचा व्यापक अर्थ सांगून संपूर्ण जगाला एक नवीन दिशा मिळवून दिली. मानवतावादाच्या आधुनिक मूल्यांना अध्यात्मिक कोंदणात बसविले. धर्माच्या माध्यमातून त्यांनी आधुनिक उदारमतवादाचे संस्कार लोकांवर बिंबवण्याची शिकस्त केली.

## संदर्भ

१. विवेक कुमार मिश्रा, महात्मा गांधी के राजनितीक दर्शन मे, स्वराज की अवधारणा (२००८), पी.एच.डी. शोधप्रबंध, डॉ. राममनोहर लोहिया विश्व विद्यालय, फैजाबाद.

२. आज के सावल मे गांधी के जबाब, गांधी स्मारक निधी, राजघाट

३. दुर्गा दत्त पाण्डेय, गांधी दर्शन के मूल बिन्दु, शेखर प्रकाशन

४. युसुफ बेन्नूर, महात्मा गांधी प्रणित सामाजिक कार्य आणि व्यावसायिक सामाजिक कार्यांचा तुलनात्मक अभ्यास, पी.एच.डी. शोधप्रबंध, एप्रिल २०१६, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

५. आर. के. प्रभु व यु आर. राव, महात्मा गांधीचे विचार, १९६७, नवजीवन प्रकाशन मंदीर, अहमदाबाद.

६. सुजाता, गांधी की नैतिकता, जून २०१२, सर्व सेवा संघ प्रकाशन, आयएसबीआयएन ९७८-८१-९२२७५५-७-४

७. Brecht A. Political Theory. The foundation of Twentieth Century Political Thought] 1959] Princetion Univesity.

८. Kunzra H.N.. Spiritualise Pilitics , Mahatma Gandhi.

९. Mahatma Gandhi. His life and Times. 2003. Louis T-isher, Bhartiya Vidya Bhavan.

१०. अशोक चौसाळकर, धर्म, समाज आणि राजकारण, लोकवाड्मय गृह.

११. बाळ कांबळे, धर्म आणि राजकारण, २००३, सातारा अक्षर प्रकाशन.

१२. रविंद्रनाथ ठाकूर, महात्मा गांधी, १९८५ महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई.

१३. प्रकाश बाळ, किशोर बेडकी हाक, धर्म आणि राजकारण विपर्यास आणि वस्तुस्थिती.



Scanned with OKEN Scanner